# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १८० वा मंगळवार दि.०१ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## जल जीवन मिशन योजना सोलारायझेशनवर आणा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई :- जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेत राज्याचा सहभाग अधिक दिसावा यासाठी योजनेची कामे मिशन मोडवर करून ही योजना संपूर्ण सोलारायझेशनवर आणावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जलजीवन मिशन योजनेतून घेण्यात येणाऱ्या योजनांचे सोलारायजेशन झाल्यास वीज बरोबरच वीज बिलात बचत होईल. यासाठी विभागाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन एक सर्वसमावेशक आराखडा तयार करावा. नल जल मित्र या योजनेसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री कौशल्य विकास योजनेतून या तरुणांना प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. सह्याद्री अतिथी गृह पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पुढील १०० दिवसाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार राज्यमंत्री डॉ.




पंकज भोयर, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि संबधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

## मी सदैव खेळाडूंच्या पाठीशी : माजी क्रीडा मंत्री आ.संजय बनसोडे

### व्हॉलीबॉलच्या राज्यस्तरीय स्पर्धा उदगीरला घेणार

*उदगीर / प्रतिनिधी :- आपल्या उदगीर शहरातील जिल्हा परिषदेचे मैदान जे आता तालुका क्रीडा संकुल या नावाने ओळखले जात आहे. या मैदानावर मागील काळात विविध स्पर्धा झाल्या असुन यामध्ये कुस्ती, फुटबॉल व क्रीकेट या स्पर्धेसह अनेक खेळांच्या स्पर्धा झाल्या आहेत. येथे होत असलेली १९ वर्ष वयोगटातील चौथी राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेचे आयोजन याच मैदानावर झाले असल्याने आनंद वाटत आहे. भविष्यात आपण लंगडी स्पर्धेला राजाश्रय मिळवून देणार असुन मी सदैव खेळाडुंच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही माजी क्रीडा मंत्री आ.संजय बनसोडे यांनी दिली. ते उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर लातूर जिल्हा लंगडी असोसिएशन ग्रामीण उदगीर द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय लंगडी स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी देवर्जन येथील स्वातंत्र्य सैनिक शिक्षण संस्थेचे सचिव ओमप्रकाश




साकोळकर, बस्वराज पाटील कौळखेडकर, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, लंगडी स्पर्धेचे महाराष्ट्र राज्य सचिव चेतन पागावार, प्रा. डॉ. बस्वराज धोतरे, रा.कॉं.चे शहराध्यक्ष सय्यद जानीमियॉं, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर, तालुका क्रीडाधिकारी चंद्रकांत लोदगेकर, लातुर जिल्हा लंगडी असोसिएशनचे सचिव तथा आयोजक जयराज धोतरे, सागर राऊत, नरेश जैस्वाल, उदय जाधव, अशोक परीट आदी उपस्थित होते, पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, आपण क्रीडा मंत्री असताना खेळाडुंच्या हिताचे अनेक निर्णय घेतले असुन मिशन लक्षवेध मध्ये विविध क्रीडा प्रकार आहेत. आपण क्रीडा विभागाचा मंत्री म्हणून काम हाती घेतल्यानंतर क्रीडा विभागाचे रखडलेले विविध तीन वर्षाचे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते पुण्यात वितरीत केले. यावेळी खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी सुवर्णपदक विजेत्या खेळाडुंना १ कोटी, रौप्य पदकासाठी ७५ लक्ष तर कास्य पदकासाठी ५० लक्ष व सहभागी खेळाडुंना १० लक्ष देण्याचा निर्णय आपण क्रीडा मंत्री असताना घेतला आहे. पुण्यामध्ये ऑलम्पिक भवनच्या उभारणीचे काम चालु आहे. भविष्यात उदगीर शहरात व्हॉलीबॉलच्या राज्यस्तरीय स्पर्धा घेणार असुन खेळाडुंनी ध्येय, दृष्टीकोन, कृती या त्रीसुत्रांचा अवलंब करुन आपले ध्येय गाठावे असे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.यावेळी लातूर, नाशिक, नागपूर, चंद्रपूर सह राज्यातील आठ विभागातील मुले व मुलींचे संघ उपस्थित होते.

## तालुक्यातील आदिवासी भागात १०८ एम्बुलेंस वाढविण्याची होतेय मागणी,एम्बुलेंस

### उपलब्ध होत नसल्याने गमवावे लागतात रुग्णांना प्राण ?

किनवट/शेख शौकत:-तालुक्यातील मोठे आजार आणि अपघाताला लक्षात घेऊन प्रशासनाने एम्बुलेंस मंजूर करावी अशी मागणी होत आहे. जेणेकरून लोकांचे प्राण वाचू शकतील आणि ते वेळेत रुग्णालयात पोहोचू मरीज आला उपचार मिळू शकतील. जलधरा, बोधडी, उमरी बाजार, दहेली तांडा,व मांडवी या सर्व दवाखान्यांना एम्बुलेंसची गरज आहे. तालुक्यात केवळ गोकुंदा व इस्लापूर या दोनच ठिकाणी १०८ एम्बुलेंस आहेत. तालुक्याचा विस्तार मोठा असल्याने अपघात झाला किंवा एखादा माणूस अत्यवस्थ झाला तर ग्रामीण भागात थांब बोलायचं एम्बुलेंस पोहोचायला वेळ लागत आहे. कॉल केल्यानंतर सर्व प्रोसेस झाल्यानंत एम्बुलेंस पोहोचेपर्यंत कधी कधी रुग्णाला आपला प्राण गमवावा लागत आहे. त्यामुळे आणखी किमान दोन ते तीन १०८ एम्बुलेंस वाढविण्याची गरज असल्याची मागणी होत आहे. किनवट या आदिवासी तालुक्याचा दक्षिण ते उत्तर असा विस्तार मोठा असून किनवट तालुक्याची २०११ च्या ग्रामीण रुग्णालय आहे. १९ डिसेंबर रोजी रात्री ८:३४ वाजता सिंगारवाडी रुग्णासाठी १०८ ला टोल फ्री कॉल केल्यानंतर गोकुंदा येथील १०८ एम्बुलेंस उपलब्ध करून देण्यात आली ती सिंगारवाडी येथे रात्री साडेनऊ वाजता पोहोचली. तोपर्यंत गंगाधर कदम नामक रुग्णाची प्राणज्योत मालवली होती. तेच बोधडीला १०८ एम्बुलेंस असती तर गंगाधर कदम यांचे प्राण वाचले असते. तालुक्याचा विस्तार पाहता एकतर बोधडी प्राथमिक आरोग्य केंद्र, दहेलीतांडा किंवा उमरी (बाजार) प्राथमिक आरोग्य केंद्र या पीएचशी नव्याने १०८ एम्बुलेंस देऊन टोल फ्री १०८ एम्बुलेंसची परवड दूर करावी, अशी मागणी होत आहे.

:लोकसंख्येच्या तुलनेत एम्बुलेंस हवी

* ग्रामीण भागात एखादा अपघात झाला किवा एखादा रुग्ण अत्यवस्थ झाला तर १०८ ला टोल फ्री कॉल केल्यास एकतर गोकुंद्याची १०८ ची एम्बुलेंस आदिलाबाद किंवा बाहेर गेलेली असते. खासगी एम्बुलेंस परवडेना इस्लापूर प्राथमिक आरोग्य केंद्राची १०८ ची एम्बुलेंस ही बोधडी भागात यायला वेळ लागतो. एखाद्या रुग्णाला ऑक्सिजन लावून न्यावे लागते तर खास एम्बुलेंस गोरगरिबांना परवडणारे नाही. विस्ताराने मोठा असलेल्या किनवट तालुक्यात केवळ दोनच १०८ एम्बुलेंस असल्याने रुग्ण वाहतूक व्यवस्थित होत नाही दवाखान्यात रुग्ण वेळेवर पोहोचत नसल्याचा प्रत्यय आला आहे. ग्रामीण भागातील जनतेला विनाविलंब आरोग्य सेवा मिळावी यासाठी नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ६५ आरोग्य उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. विस्ताराने किनवट तालुका हा मोठा असला तरी लोकसंख्येच्या तुलनेत १०८ च्या म्बुलन्स उपलब्ध नाहीत.




## भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त लातूर येथे व्याख्यान व कवी संमेलनाचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी :- येथील भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा पश्चिम शाखा, लातूर तालुका व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री मुक्ती दिन व भीमा कोरेगाव शौर्य दिनाचे औचित्य साधून दि.१ जानेवारी २०२५ रोजी मुलगंध कुटी,बुद्ध विहार सुभेदार रामजी नगर, लातूर येथे व्याख्यान व कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी सायंकाळी ५. वाजता परिवर्तनाचा विचार आणि समकालीन वास्तव या विषयावर शिवाजी महाविद्यालय, रेणापूर येथील मराठी विभाग प्रमुख ,प्रसिद्ध वक्ते आणि समीक्षक डॉ.जयद्रथ जाधव हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानाच्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आयु.एम.एम. बलांडे हे उपस्थित राहणार आहेत.तर आयु. अशोक शिंदे, आयु.दत्तात्रय भोसले, आयुनि. शारदा हजारे आणि आयुनि.वंदना कांबळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यानंतर सायंकाळी ठीक ६. वाजता लातूर शहर व परिसरातील निमंत्रित कवींचे कवी संमेलन संपन्न होणार आहे.या कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी व गझलकार मा.संजय घाडगे हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रसिद्ध कवी मा.रमेश चिल्ले,मा.योगीराज माने आणि डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांची या कवी संमेलनासाठी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी व सूत्रसंचालक प्रा.डॉ.क्रांती मोरे आणि मा.राजेंद्र माळी हे करणार आहेत.तर निमंत्रित कवी म्हणून नरसिंग इंगळे, प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे, प्रा.युवराव धसवाडीकर, डॉ.लहू वाघमारे, शैलजा कारंडे,दयानंद बिराजदार,रजनी गिरवलकर, प्रा.कल्याण राऊत, गोविंद जाधव, सुनिता मोरे,प्रा. शिवशरण हावळे,विलास घारगावकर, दिलीप गायकवाड,हसीन पटेल, प्रा.मीना घुमे,ऋचा पत्की, अभिमन्यू लामतुरे ,सय्यद तहसीन रमेश हणमंते, विमल मुदाळे, सुरेखा भालेराव, वैभवी कांबळे, छाया ओव्हळ, सुनिता हिरवे इ.कवी उपस्थित राहून आपल्या कविता सादर करणार आहेत.या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी लातूर शहर व परिसरातील सर्व रसिक,श्रोत्यांनी उपस्थित रहावे. असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने प्रा.डॉ.लहू वाघमारे, आयु.हिराचंद गायकवाड,आयु.देवदत्त बनसोडे,आयु.राजाराम साबळे, आयु.हणमंत कांबळे, प्रा.गौतम बनसोडे, आणि प्रसेनजित जोगदंड यांनी केले आहे.

## लातूरचे मनपा आयुक्त मनोहर यांच्या कार्यकाळातील संपूर्ण निविदा प्रक्रियांची चौकशी करावी - ॲड. सूरज साळुंके

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या कार्यकाळातील लातूर शहर महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत राबविण्यात आलेल्या संपूर्ण निविदा प्रक्रियेची विशेष व तज्ज्ञ समिती मार्फत सखोल चौकशी करून सदर नियमबाह्य , बेकायदेशीर निविदा प्रक्रियांमध्ये सहभागी कंत्राटदार, आयुक्त मनोहर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी - कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार ,लातूर ग्रामीणचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. सूरज बी. साळुंके यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना केली. शहरातील भूमिगत गटार योजनेच्या २३० कोटी रुपयांच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाची नियमबाह्यरित्या निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणीही आपण राज्याच्या मुख्य सचिवांकडे केल्याचे त्यांनी सांगितले. लातूर शहरातील भूमिगत गटार योजनेच्या टप्पा-२ च्या कामासाठी केंद्र शासन व राज्य शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. या कामाची निविदा दि. ११ ऑक्टोबर २२०२४ रोजी लातूर महानगरपालिकेने प्रसिद्ध केली. दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी या कामाच्या निविदा भरलेल्या



निविदाधारकांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. हे काम करण्यासाठी अंकिता कन्सट्रक्शन, भुगण इनफ्राकोन प्रा. लि., दिनेशचंद्र आर. अग्रवाल इनफ्राकोन प्रा. लि., जयवरुडी इनफ्राकोन प्रा. लि. आणि कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि. या पाच कंत्राटदारांनी निविदा भरल्या. मात्र त्यातील अहमदाबादच्या कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि. या कंत्राटदाराने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली नसतानाही त्यांनाच हे काम मॅनेज करून देण्यासाठीचे अर्थिक व्यवहार झाले. त्यासाठी चंद्रपुरच्या त तायडे नामक व्यक्तीने पुढाकार घेतला. या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेली कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि.ही कंत्राटदार कंपनी ही निविदा भरण्यास तांत्रिक व आर्थिक दृष्टीकोणातून अपात्र आहे . एवढेच नव्हे तर, त्यांनी महाराष्ट्रात व इतर राज्यातील विविध महापालिकेमधील केलेल्या कामाचा पूर्वानुभव हा अत्यंत खराब व सदोषपूर्ण आहे. संबंधित कंपनीने सादर केलेले बहुतांश कागदपत्र देखिल खोटे, चुकीचे व बनावट आहेत. या कंपनीने गुलबर्गा (कलबुर्गी) महानगरपालिकेचे जोडलेले वर्कडन (काम पूर्ण केल्याचे) प्रमाणपत्र ४० कोटीच्या कामाचे असताना या कंत्राटदाराने गुलबर्गा महानगरपालिकेच्या अभियंत्याच्या खोट्या स्वाक्षरी व शिक्क्याचे १४० कोटीचे प्रमाणपत्र जोडले आहे. याची कल्पना असतानाही त्यांच्यावर खोटे कागदपत्रे दिली म्हणून कारवाई करण्याऐवजी लातूर महानगरपालिकेचे प्रशासक व संबंधित विभागप्रमुख व पालिकेतील मुख्य लेखापरिक्षक व अति. आयुक्त यांनी संगनमत करून हे काम याच कंत्राटदार कंपनीस देण्याचा घाट घातला जात आहे.

या गैरप्रकाराबाबत संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख तथा शहर अभियंत्याकडे विचारणा केली असता आयुक्त मनोहरे यांचा त्याबाबत तोंडी आदेश असल्याचे सांगितले जात आहे.

भूमिगत गटाराचे हे २५० कोटींचे काम कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि. या कंत्राटदारासच देण्यासाठी या निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेतलेल्या ईतर कंत्राटदारास तांत्रिक कारण देवून आणि जिओ-टॅग नसल्याचे कारण देवून निविदा प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्याचा गैरप्रकार केला जात आहे. त्यामुळे लातूर मनपाकडून राबविण्यात येत असलेली ही निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करावी. या कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी सर्व पात्र कंत्राटदारांना समान संधी उपलब्ध करून द्यावी व तसेच बाबासाहेब मनोहरे यांच्या कार्यकाळातील लातूर मनपाद्वारे मागील दोन वर्षामध्ये राबविण्यात आलेल्या सर्व निविदे प्रकियेची विशेष समिती नेमून विस्तृत स्वरुपात चौकशी करून नियमबाह्यरित्या राबविण्यात येत असलेल्या निविदा प्रक्रियामध्ये सहभागी लातूर मनपातील अधिकारी, कर्मचारी व त्रयस्थ व्यक्ती असलेले विकास तायडे यांच्या विरुद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी ॲड. सूरज बी. साळुंके यांनी यावेळी बोलताना केली. निविदा प्रक्रिया नियमानुरूप राबवली जावी एवढीच आपली यामागची प्रांजळ भूमिका असल्याचेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी अजहर शेख , ॲड. प्रशांत चव्हाण, प्रकाश चव्हाण यांची उपस्थिती होती.

## संपादकीय....

# काँग्रेसची वाटचाल!

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा आज २८ डिसेंबर रोजी १३९ वा वर्धापनदिन. त्यानिमित्ताने काँग्रेस पक्षाचा आजपर्यंतच्या वाटचालीचा घेतलेला आढावा.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस म्हणजे पूर्वीची राष्ट्रीय सभा असून, मुंबईत गोकुळदास तेजपाल पाठशाळेत २८ डिसेंबर १८८५ रोजी भरलेल्या अधिवेशनात काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. त्यावेळेस व्योमेशचंद्र बॅनर्जी हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. पुढे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेस पक्षाने महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या लढ्याचा इतिहास आपणा सर्वास माहीत आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे पहिले मंत्रिमंडळ स्थापन झाले. सन १९५० मध्ये देश प्रजासत्ताक झाला व ऑक्टोबर १९५१ ते मार्च १९५२ या कालावधीत देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यात ४८९ जागांपैकी ३६४ जागांवर काँग्रेस पक्षाने विजय मिळवला.

१७ ऑगस्ट १९५१ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला 'बैलजोडी' हे निवडणूक चिन्ह दिले. सन १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या निधनानंतर काँग्रेसची सूत्रे इंदिरा गांधी यांच्याकडे आली. काँग्रेस मधील काही सहकार्यांशी मतभेत झाल्याने सन १९६७ मध्ये काँग्रेसचे विभाजन झाले.त्यावेळी निवडणूक आयोगाने 'बैलजोडी' हे निवडणूक चिन्ह गोठवून 'गायवासरू' हे नवीन चिन्ह दिले. या चिन्हावर सन १९७१ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या व पुन्हा पक्षाला ५१८ पैकी ३५२ जागा मिळून विजयाची माळ काँग्रेसच्या पारड्यात पडली. सन १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी लावली. याचा परिणाम मात्र काँग्रेसवर झाला व सन १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत जनता पक्षाला बहुमत मिळून काँग्रेस पक्षाला ५४२ पैकी १५३ जागा मिळाल्या. मात्र आणीबाणी नंतर पुन्हा काँग्रेसचे विभाजन झाले व त्यानंतर 'गायवासरू' हे चिन्ह पुन्हा निवडणूक आयोगाने गोठवून 'हाताचा पंजा' हे दिलेले चिन्ह आजतागायत आहे.

एकंदर काँग्रेस पक्षाचा तेव्हा व आताचा कारभार पाहता कुठेतरी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न कमी पडत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.ज्या पंडित नेहरूंनी त्याकाळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची फळी तयार केली, त्याद्वारे अनेक नवीन कार्यकर्ते तयार झाले, आत्मचिंतन शिबिरे भरवली, अनेक अधिवेशने भरवली, देशाच्या विकासाच्या दृष्टीने भरीव कार्य केले त्या काँग्रेसची आज काय अवस्था काय झाली आहे? पंडित नेहरूंच्यानंतर इंदिरा गांधींच्या व त्यानंतर राजीव गांधींच्या काळात काँग्रेसचा आलेख उंचावणारा होता, पण कालांतराने सामान्य कार्यकर्त्यांची नवीन फळी न तयार झाल्याचा अभाव व नेहरू-गांधी यांच्या भरीव कार्यावर आजपर्यंत मागितलेली मते याचा कुठेतरी फटका काँग्रेसला बसला असावा असे वाटते.

लोक आता तुम्ही व तुमच्या पक्षाने केलेले काम याचा आढावा घेऊनच मतदान करतात. पूर्वी ग्रामपंचायत ते लोकसभा-विधानसभा यात काँग्रेसच्या विजयाचा ध्वज अविरत फडकत असे. पण हा ध्वज फक्त सन २००९ च्या लोकसभा-विधानसभा निवडणुकांपर्यंत सर्वांना पाहायला मिळाला. त्यानंतर कधी कोणत्याही निवडणुकीत बहुमत नसलेला पूर्वीचा जनसंघ म्हणजे आताच्या भारतीय जनता पक्षाने गांगाचा जोर लावला व आपल्या विजयाचा ध्वज डौलाने फडकत ठेवला आहे. काँग्रेसनेही नव्याने कार्यकर्ते घडवावे व निवडणुकीद्वारे देशापुढे चांगला ठोस कार्यक्रम ठेवून बहुमत मिळवावे. हे काँग्रेसला आजही करता येण्यासारखे आहे. कारण सध्याची परिस्थिती पाहता काँग्रेसला आत्मचिंतनाची गरज आहे का? असा प्रश्न उपस्थित केला असता याचे उत्तर नक्कीच होय असे येईल.

कारण आजपर्यंतची देशाची एकंदरीत परिस्थिती पाहिली तर 'काँग्रेसच बरी होती' असे सामान्य माणूस म्हणतो आहे. पण शेवटी मतदार राजा आपल्या देशाचे भवितव्य विचारपूर्वक ठरवतो.आज अनेक वर्षे पक्षाशी एकनिष्ठ असलेले कार्यकर्ते, नेते मंडळी पक्षांतर करत आहेत.त्यांना थांबवण्याची क्षमता आज काँग्रेस पक्षात उरली नाही का? निवडणुका आल्या की पक्षांतर हे एक समीकरणच झालं आहे.तिकीट नाकारले तरीही पक्षांतर! हे सर्व थांबवण्यास आज काँग्रेस पक्ष व त्याचे पक्ष श्रेष्ठी कुठेतरी कमी पडत आहेत का? असा प्रश्न नक्कीच उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही. १३९ वर्षांची परंपरा लाभलेला या पक्षाचे आज काय चित्र आहे हे आपण पाहतो आहोत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस पक्ष विसर्जित करून आपण नवा पक्ष काढला पाहिजे, असे महात्मा गांधीजींचे म्हणणे होते, पण काँग्रेसने स्वातंत्र्य मिळाल्यावरही त्याच नावाने हा पक्ष पुढे चालवला.

महत्त्वाचे म्हणजे महात्मा गांधीजी बेळगावच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष होते हा अपवाद वगळता काँग्रेसच्या कोणत्याही पदावर ते नव्हते. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ५४३ पैकी ९९ जागांवर, तर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत फक्त १६ जागांवर समाधान मानावे लागले. अनेक दिग्गज नेत्यांचे पराभव झाले. याचा एकदा काँग्रेसने आत्मचिंतन करताना गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. लोकसभेत काँग्रेसने महाराष्ट्रात सर्वाधिक १३ जागा जिंकल्या होत्या. मात्र लोकसभेच्या निकालानंतर हुरळून न जाता काँग्रेसने विधानसभेची तयारी करायची गरज होती. इथे एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते व ती म्हणजे आजपर्यंत सेक्युलर विचारसरणीच्या या पक्षाने शिवसेनेसारख्या विचारसरणी असणार्या पक्षासोबत केलेली युती योग्य आहे का?

मात्र काँग्रेसची समानतेची विचारधारा आहे. सर्वांना सोबत घेऊन जाणारी विचारधारा असल्याने हा पक्ष पुन्हा एकदा उसळी घेईल. तळागाळात पोहोचलेल्या या पक्षाच्या वटवृक्षाची मुळे खोल जमिनीत रुतलेली आहे. अनेक उन्हाळे पावसाळे पचवून हा वटवृक्ष उभा आहे. या वटवृक्षाला नवी पालवी फुटो आणि हिरव्यागार पानांनी बहरू दे अशी आजच्या काँग्रेस स्थापने दिवशी सदिच्छा.

# ।।।। शहिद व जखमी महारवीरांना माझे सॅल्यूटऽऽऽ...।।।।

(१ जानेवारी: भिमा कोरेगांव शौर्य दिन विशेष.)

_या शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून लाखो आंबेडकर अनुयायी येत असतात. पहाटेपासूनच विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी उसळत असते. २०६ वर्षांपुर्वी कोरेगाव भीमा येथे झालेल्या लढाईत महारवीर आणि इतर समाजातील सैनिकांच्या पराक्रमामुळे ब्रिटिशांनी पेशव्यांच्या सैन्याचा धुव्वा उडविला होता. दि.१ जानेवारी १९२७ रोजी विश्ववंद्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या विजय स्तंभास भेट देऊन हा इतिहास पुढे आणला. तेव्हापासून या ठिकाणी शौर्य दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. याबद्दल सविस्तर बोधप्रद व रोचक माहिती श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात संकलित केली आहे...



प्रत्येक शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा परिसरात म्हणजेच शिक्रापूर आणि लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी या कालावधीत मद्य विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या काळात परिसरातील सर्व मद्य दुकाने पूणर्तः बंद ठेवली जातात. या बंदीच्या नियमाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी देत असतात. यासाठी काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी विजयस्तंभ परिसरात नियोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

पार्श्वभूमी: इ.स.१८००च्या दशकांत मराठा साम्राज्य अनेक तुकड्यांत विभागलेले होते. त्यात पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले अशा तुकड्यांमुळे कमकुवत साम्राज्य होते. ब्रिटिश साम्राज्याने ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर यांच्या प्रमुखांशी शांतता करार वा तह करून त्या त्या संस्थानांचा भाग आपल्या राज्याला जोडला होता. दि.१३ जून इ.स.१८१७ रोजी पेशवे आणि गायकवाड घराण्यात महसुलावरून वाद झाला; त्यात बाजीराव पेशवे यांनी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतली व बडोदा संस्थानाचा मोठा भाग पेशवाईत समाविष्ट केला. परंतु यासाठी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतल्याने अप्रत्यक्षपणे तो भाग ब्रिटिशांनी आपल्या राज्यास जोडला. त्यामुळे मराठा साम्राज्य ब्रिटिश अधीनस्त झाला आणि पेशवे केवळ नामधारी उरले. अल्पावधीतच पेशव्यांनी ब्रिटिशांना नमवण्याचा प्रयत्न खडकीची लढाईत केला, परंतु ब्रिटिशांनी तेथेही पेशव्यांचा पराभव केला. ही लढाई दि.५ नोव्हेंबर १८१७ रोजी झाली होती. त्यानंतर पेशव्यांनी तेथून सातारा येथे पळ काढला, तेव्हा ब्रिटिशांनी पूर्णपणे पुण्यावर ताबा मिळवला. पुणे हे चार्लस बार्टन बर व कर्नल जनरल स्मिथ यांच्या नेतृत्वाखाली होते आणि ते पेशव्यांचा पाठलाग करत होते. दरम्यान कर्नल स्मिथ याला भिती वाटत होती की, पेशवे तेथूनही निसटून कोकणात जातील व तेथे राज्य करतील, म्हणून त्याने कर्नल बर याला कोकणात आणखी कुमक पाठवण्यास सांगितली. एक जास्तीची कुमक पुण्याजवळील शिरूर येथे ठेवण्यास सांगितली. दरम्यान पेशवे कर्नल स्मिथचा पाठलाग चुकवून निसटून जाण्यात यशस्वी झाले, परंतु दक्षिणेकडून कर्नल थेओफिलस प्रिझलर सैन्यासह तयार होताच, ते पाहून पेशव्यांनी मार्ग बदलला आणि पूर्वेकडे चालत नाशिकच्या वायव्य भागातून पुढे सरकले आणि कर्नल स्मिथ त्यांच्यावर हल्ला करेल, या भीतीने ते पुन्हा पुण्याकडे वळले. डिसेंबर १८१७च्या अखेरीस कर्नल बरला बातमी समजली की, पेशवे पुण्यावर चालून येत आहेत, तेव्हा त्याने शिरूर येथील सैन्याला मदतीसाठी तयार राहण्यास सांगितले. ते सैन्य पुढे सरसावले आणि त्यांची लढाई कोरेगाव भिमा या गावात जुंपली.

मराठा सैन्य: मराठ्यांचे २८ हजार सैन्य होते, ज्यातील २० हजार घोडदळ, ८ हजार पायदळ सतत तैनात असे. कंपनी सरकाराच्या सैन्यांनी हल्ला करू नये, यासाठी प्रत्येकी ६शे सैनिकांच्या तीन तुकड्या तैनात असत. या सैनिकांत अरब, गोसावी व मराठा जातीचे सैनिक असत. हे सैन्य पहिल्या फळीत हल्ला करण्यासाठी अरब सैन्याचा वापर करीत असे. तसेच त्यासाठी भाडोत्री सैनिक व त्यांचे वारस यांचाही सैन्यात वापर केला जात असे. सैन्यात घोडदळ आणि तोफखाना असे दोन विभाग ठेवलेले असत. लढाईचे नेतृत्व बापू गोखले, अप्पा देसाई आणि त्रिंबक डेंगळे यांनी केले होते. पैकी त्रिंबकजी डेंगळे हे कोरेगाव लढाईत प्रत्यक्ष सहभागी होते. तर अन्य जवळच्या फूलसेहर आत्ताचे फुलगाव येथे होते.

ब्रिटिशांचे सैन्य: ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे ८३४ सैनिक होते. दुसऱ्या बटालियन- बॉम्बे नेटिव्ह आर्मी तुकडी क्र- १०२मधील महार जातीचे सुमारे ५०० सैनिक होते. या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टाँटन यांनी केले. अन्य अधिकाऱ्यांमध्ये लेप्टनंट आणि अड्ज़ुटंट पिटसन, लेफ्टनंट जॉन्स, असिस्टंट सार्जंट विंजेट हे होते. लेफ्टनंट स्वान्सटन नेतृत्व करीत असलेले सुमारे ३०० सैनिकांचे घोडदळ होते. २४ युरोपियन आणि ४ तोफा चालवणारे स्थानिक मद्रासी गोलंदाज व सहा पावडर तोफा होत्या. यांचे नेतृत्व लेफ्टनंट चिसलोम करत होते. याचबरोबर साहाय्यक सार्जंट वायली- वायल्डे यांचा तोफाखान्यात समावेश होता. महारांचे नेतृत्व रतननाक, जाननाक व भकनाक या तिघांनी केले होते.

शहिद व जखमी महारवीर: कोरेगांवच्या युद्धात २० महार सैनिक आणि ५ अधिकारी शहीद झाले. त्यांना माझे या लेखरुपाने कोटी कोटी सॅल्यूट..! शहीद झालेल्या महारवीरांची नावे, त्यांच्या सन्मानार्थ बनवल्या गेलेल्या स्मारकावर अंकित आहेत. ती अशी- गोपनाक मोठेनाक, शमनाक येशनाक, भागनाक हरनाक, अबनाक काननाक, गननाक बालनाक, बालनाक घोंड़नाक, रूपनाक लखनाक, बीटनाक रामनाक, बटिनाक धाननाक, राजनाक गणनाक, बापनाक हबनाक, रेनाक जाननाक, सजनाक यसनाक, गणनाक धरमनाक, देवनाक अनाक, गोपालनाक बालनाक, हरनाक हरिनाक, जेठनाक दीनाक आणि गननाक लखनाक. या लढाईत महारांचे नेत्रत्व करणाऱ्यांची नावे अशी- रतननाक, जाननाक, व भकनाक. तर या युद्धात जख्मी झालेल्या महार योद्धांची नावे येणेप्रमाणे- जाननाक, हरिनाक, भीकनाक, रतननाक आणि धननाक.

लढाई: भिमा कोरेगाव लढाई दरम्यान ब्रिटिशांची व्यूहरचना- पेशवा दुसरा बाजीराव नासिककडे न जाता ओझरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून ता.३० डिसेंबर रोजी चाकण येथे येऊन पोहचला, अशी बातमी स्मिथ यास कळली. पूर्वी कोंकणांतून मुंबईकडून इंग्रज फौज येत होती, तिला गाठावे किंवा पुण्यावर येऊन ते शहर एकदम हस्तगत करावे, असा बाजीरावचा बेत असल्याचे स्मिथ यास दिसून आले, दोन्ही गोष्टी इंग्रजांस बिकटच होत्या. पुण्यास इंग्रजांचा बंदोबस्त अगदींच तात्पुरता होता. त्याने आपल्या मदतीस शिरूरहून जास्त फौज बोलावली होती, त्यावरून कॅ.स्टाँटन थोडे इंग्रज सैन्य बरोबर घेऊन ता.३१ डिसेंबर १८१७रोजी रात्री ८ वाजता शिरूरहून निघाला, तो दुसऱ्या दिवशी स.१० वाजता कोरेगांवजवळ येऊन उतरला. तेथील टेकडीवरून त्याला पेशव्याची प्रचंड फौज भीमा नदीच्या काठीं दिसली. स्टाँटनची बातमी बापू गोखल्यास होतीच. घोडनदीहून वरील इंग्रज फौज पुण्यास येत होती. तिची बाजीरावाशीं अकस्मात गाठ पडली. बापू गोखल्यास श्रीमंतानी आज्ञा केली, की आज लढाई करून आम्हास पुढे जाण्यास मार्ग करून द्यावा. गावास लहानशी तटबंदी होती तेथे इंग्रज आश्रयार्थ गेले. त्यावर दुसऱ्या बाजूने मराठ्यांनी तोफांचा मारा सुरू केला. जागा अडचणीची असल्यामुळे तोफा बंद करून मराठ्यांकडील अरबांनी व पायदळांनी इंग्रजांवर चाल केली. तेव्हा संगिनीचे व तरवारीचेच युद्ध झाले. दोन्ही बाजूंचे भरपूर नुकसान झाले. रात्री ९ वाजेपर्यंत लढाई चालून मराठ्यांचे सैन्य आपल्या छावणीकडे परत आलें. सकाळी इंग्रजांच्या सैनिकांनी पाहिले तर मराठा सैन्य निघून गेल्याचे दिसले. यात इंग्रजांचे २७५ मारले गेले तर १७५ जखमी झाले, त्यापैकी बहुतेक होतकरूच होते. मराठ्यांचे सुमारे ५००-६०० लोक पडले. बाजीराव तर अगोदरच जेजुरीच्या वाटेने साताऱ्याकडे निघाला होता. पाठीमागून जनरल स्मिथ येत असतां त्यास ओझरच्या घाटात त्रिंबकजी डेंगळ्याच्या रामोशांनी इतके सतावून सोडले, की ता.२ जानेवारी १८१८ रोजी जेमतेम तो चाकणला येऊन पोचला. त्याच दिवशी कॅ.स्टाँटन हा जखमी झालेले लोक व उरलेली फौज बरोबर घेऊन परत शिरूरच्या छावणीत गेला. हेन्री टी प्रिंसेप यांनी लिहिलेल्या हिस्टरी ऑफ द पॉलटिकल अँड मिलिट्री ट्रान्जॅक्शन्स इन इंडिया पुस्तकात या लढाईचा संदर्भ आहे. महार समाजातल्या माणसांचा समावेश असलेल्या ईस्ट इंडिया तुकडीच्या धाडसाचे वर्णन या पुस्तकात आहे.

कोरेगावची लढाई हीची अन्य नावे- कोरेगाव भिमाची लढाई, भिमा कोरेगावची लढाई अशी आहेत. ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई दि.१ जानेवारी १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण ८३४ सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ.स्टाँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडीचे सुमारे ५०० महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने २८ हजार सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरा करीत होता. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. दुसरा बाजीराव पेशवा यांच्या नेतृत्वाखालील सैन्य कंपनीच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना अनपेक्षितपणे त्यांस कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते. पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे २ हजार सैनिक पाठवले. कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ १२ तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली. ही लढाई इंग्रज-मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाचा भाग होती. या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली.

पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. १८००च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेले होते. कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या ४९ सैनिकांची नावे कोरली. यामध्ये २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे- जपश`ष ींहश ढीर्ळींहि`ष ींहश ईीेंळीह -ीू`ष ींहश एरीींह.

या महाप्रतापी महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध, विशेषतः पूर्वाश्रमीचे महार अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते. !! शौर्य दिनानिमित्त सर्वांना क्रांतिकारी जय भीम !!

-----------------

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३

# शुरविरांना वंदन करण्याचा अधिकार आहे का?

शुरविरांना लाखोंच्या संख्येने वंदन करायला लोक कोरेगांव भिमा येथे जातात. आपण डोळसपणे विचार केला तर असे दिसुन येते की नागपूर, मुंबई, छ. संभाजी नगर पुर्वीचे औरंगाबाद, कोरेगांव भिमा येथे ठराविक दिवशी लाखोंच्या संख्येने स्वतःला बौद्ध म्हणवून घेणारे लोक जातात. गर्दी प्रचंड असते हे कोणीही नाकारु शकत नाही. एक जानेवारी कोरेगांव भिमा, १४ जानेवारी औरंगाबाद, अशोक विजया दशमी नागपूर व औरंगाबाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन मुंबई येथे लाखोंच्या संख्येने लोक जमतात, करोडो रुपयांची पुस्तक विक्री होते हे खरे असले तरीही झालेली गर्दी आणि विकल्या गेलेल्या पुस्तकांचा सामाजिक पातळीवर अपवाद वगळता कुठेही फायदा होताना दिसत नाही. उदाहरण म्हणून बघायचे झाले तर १४ जानेवारी ला विद्यापीठ नामविस्तार दिन दरवर्षी लाखोंच्या संख्येने लोक एकत्र येऊन साजरा केला जातो. विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे यासाठी जिवाची बाजी लावून एकीकरणाद्वारे नामांतर लढा यशस्वी केल्या गेले. परंतु विद्यापिठाच्या कमानीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आल्यानंतर विद्यापिठातील विद्यार्थांच्या समस्या संपल्या का? विद्यापिठातील शिक्षणाचा दर्जा वाढला का? आणि याचे उत्तर नाही असेल तर विद्यापीठ नामविस्तार दिनी गर्दी करण्याचा फायदा का? तीच बाब विजया दशमी दिनी लागु होते. डोक्यात विषमता, अंधविश्वास घेऊन एक दिवस अशोक विजया दशमीला धम्माचा आव अंगात आणणे किती योग्य आहे? महापरिनिर्वाण दिनी मुंबई ला लाखों लोक जातात परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गाने, विचाराने चालणारे लोक किती आहेत? यावर मात्र विचार विनीमय होणे गरजेचे आहे. तिच परिस्थिती एक जानेवारी कोरेगांव भिमाला जाऊन पाचशे शुरविरांना वंदन करण्यासाठी लाखों लोक जमा होतात. गर्दी करतात आणि परत येतात. पण एक दिवस शूर झालेले लोक वर्षेभर लाचार व गुलाम म्हणून जिवन जगतात याची किव येते. आपण जर कोरेगांव भिमाचाच विचार केला तर आपल्या लक्षात येईल की पाचशे शुरविर पूर्वजांनी अठ्ठावीस हजार पेशवे कापुन टाकले याचे कारण होते पेशव्यांचे वाढते अन्याय अत्याचार, पेशव्यांनी येथील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व राजसत्ता एकहाती घेऊन केवळ विषमता आणि भेदभावाच्या जोरावर येथे माणसाला गुलामा सारखी वागणूक देऊन त्यांचे शोषण केले जात होते. वाढता अन्याय अत्याचार हा पाचशे शुरविरांनी कोरेगांव भिमाच्या लढाईत अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून आपला विजय मिळवला. पेशव्यांच्या विरोधात महार बटालियन लढली पण या महार बटालियन मध्ये बहुसंख्य महार असले तरीही इतरीही जातींच्या लोकांचा समावेश होताच. हे सांगण्यामागचा उद्देश हाच कि पेशव्यांचा त्रास येथील सर्वांनाच होता. म्हणून अन्यायकारी पेशव्यांना नष्ट करण्याची संधी महार बटालियन कडे आली आणि त्या संधीचे सोने करून. अन्याय अत्याचारी राजवट नष्ट केली. बर पाचशे लोकांना कसे शक्य झाले? हा विषय खूप गहन व प्रेरणादायी आहे. पेशव्यांचे अन्याय अत्याचार एवढे वाढले होते की येथे माणसाला माणूस म्हणून जिवन जगने अवघड झाले होते. पेशव्यांच्या जाचाला कंटाळले होते. आणि पेशव्यांबद्दल द्वेष हा समाजामध्ये निर्माण झाला होता. अन्याय व अत्याचाराचे गांभीर्य लक्षात घेऊन महार बटालियन एकीने स्वाभिमानासाठी लढली म्हणून विजय मिळवता आला. त्याच शुरविरांच्या विजयांचे प्रतिक म्हणून जयस्तंभ उभा केला गेला आहे. आणि याच शुरविरांच्या शौर्याला वंदन अर्थात जयस्तंभाला वंदन करण्यासाठी एक जानेवारी ला सर्वात अगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यानंतर दरवर्षी आपण जातो. पण आजची परिस्थिती पाहली तर आपल्याला कोरेगांव भिमाला जाण्याचा अधिकार आहे का? त्या शुरविरांकडून आपण काही शिकलो का? अन्याय अत्याचार गाडण्यासाठी ते पाचशे एकत्र आले आणि स्वाभिमानासाठी लढले. आम्ही लाखोंच्या संख्येने जातो पण आमच्या मध्ये एकी आणि स्वाभिमान आहे का? स्वतःला आंबेडकरवादी समजून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने समाजकारण, राजकारण करून हजारो नेते तयार झाले आणि समाजातील लोकांचे विघटन करून समजाची ताकद कमकुवत केल्या गेली. स्वार्थापोटी तयार झालेले व खंडणीवर जगणारे नेते व त्यांचे चलेचपाटे हे कोरेगांव भिमाला जाऊन काय साध्य करतात? एकिने स्वाभिमाना साठी लढलेल्या शुरविरांच्या जयस्तंभाला वंदन करण्याचे नाटक करणारे राजकीय व सामाजिक नेते व त्यांचे चलेचपाटे एक मंच एक विचार व एकीकरणासाठी एकत्र का येत नसतील? जेथे समाजासाठी एकत्रच यायचे नाही, जेथे स्वाभिमाना ऐवजी स्वार्थाला महत्त्व द्यायचे अशा लोकांचा व नेत्यांचा समाजाला काय फायदा? लाखोंच्या संख्येने गर्दी केलेले लोक कोणत्या ना कोणत्या नेत्याचे भक्त असतात. बर स्वतःला आंबेडकरवादी समजणारे हजारो राष्ट्रीय नेते आहेत परंतु हजारो राष्ट्रीय नेत्यांपैकी एकाचाही एखादा आमदार खासदार नाही तरीही स्वार्थी व स्वयंघोषित नेत्यांना स्वतःला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणवून घेताना थोडीही नैतिक भिती वाटत नसेल तर यांच्या कडे नैतिकता किती आहे हे दिसून येते. येथे दररोज बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणाऱ्या माणसांना डावलले जाते, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विटंबना होते, तरीही लोक स्वतः चे दुकान बंद करून समाजाच्या हितासाठी व देशाच्या संविधाना साठी एकत्र येत नाहीत. मग कोरेगांव भिमाला जाण्याचे नाटक कशाला? खरं तर आज नागपुर, मुबंई, औरंगाबाद किंवा कोरेगांव भिमा जाणे किंवा इतरही बौद्ध स्थळांना भेटी देणे हा एक इव्हेंट झाला आहे. सर्वसामान्य लोकही जायचे म्हणून जातात आणि राजकीय नेते गर्दीचा फायदा घेऊन स्वतःच्या दुकानाची जाहिरात करतात. कशाला पाहिजे वेगवेगळे स्टेज? कशाला पाहिजे पक्ष, संघटनेच्या नावाने स्वतः चे मोठ मोठे फोटो असलेले बँनर? बँनर वर मोठमोठे फोटो टाकून आपले विचार आणि कर्म सिद्ध होत नाहीत. बँनर वर बाबासाहेब आंबेडकर व संबधीत कार्यक्रमां बद्दलची माहिती लहान आणि नेते व चलेचपाटे यांचे फोटो मोठे जसे की त्या शौर्यदिन साजरे व्हायला यांचेच मोठे योगदान आहे.

आजही समाजावर अन्याय अत्याचार होत आहे. आधुनिक अस्पृश्यता पाळली जात आहे. स्वरूप बदलले असले तरीही परिणाम मात्र पेशवाईचेच आहेत. असे असताना आपण एकत्र येण्याची तयारी दाखवून एकत्र येऊन लढण्याची तयार ठेवत नसु तर मग कोरेगांव भिमाला जाऊन किंवा मोठमोठ्या बँनरवर फोटो लाऊन फायदा काय? एकिने व स्वाभिमानाने लढले तर त्याचा फायदा समाजाला चिरकाल होतो याचा इतिहास असताना केवळ आपण देखावा करत असु तर आपण इमानदार वारस नाही हेच सिद्ध होते. आजही विद्यार्थी, नोकरदार, तरुण, व सामाजिक काम करणारे इमानदार सामाजिक कार्यकर्ते यांना या व्यवस्थेचा खुप त्रास आहे. जे स्वार्थी आहेत, स्वतः ची दुकानदारी करतात ते लोक खंडणी, मांडवली करून स्वतः चा उदरनिर्वाह करतात. यालाच शौर्य व स्वाभिमान म्हणायचे का? किमान मुंबई, नागपूर, औरंगाबाद, कोरेगांव भिमा सारख्या ठिकाणी तरी लोकांनी एकत्र येऊन आपली वैचारिक, सामाजिक एकिकरणाची ताकद दाखवून दिली तर राजकीय ताकद निर्माण होईल आणि त्याचा फायदा सर्वांना होईल. परंतु स्वतः च्या फायद्यामुळे आणि एकत्र आलोतर आपले राष्ट्रीय अध्यक्ष (शाखाध्यक्ष ची लायकी नसलेले) पद धोक्यात येईल की काय म्हणून विचारधारा व चळवळीला छिन्नविछिन्नीन करणारे लोक निर्माण झाले म्हणून कोणताही हेतु साध्य होताना दिसत नाही. पाचशे शुरविर योद्ध्यांनी आपला शत्रु ओळखून शत्रु विरोधात लढण्याची रणनीती आखली होती. फक्त ते वेळ आणि संधी शोधत होते शत्रुला पराभूत करण्याची. आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. आजचे स्वंयघोषीत नेत्यांना शत्रुची ओळख तर नाही परंतु जे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर, संविधान व चळवळ याला बदनाम करण्याचे प्रयत्न करत आहेत त्यांच्या च गोटात जाऊन आपले पोट भरत आहेत. एकदिवस स्वाभिमानी झालेले लोक प्रस्थापितांच्या पायरीवरचा श्वान होऊन कधी लाचारी करतील हेच कळत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन एखादा बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला छेद देणाऱ्या सोबत हातमिळवणी करत असेल तर तो किती लाचार झाला याची जाणीव होते. कोरेगांव भिमा जयस्तंभ एक इतिहास आहे. खुप मोठी प्रेरणा आहे. तो इतिहास आणि प्रेरणा आज वादात सापडली आहे. शुरविरांच्या जयस्तंभाला काही लोकांनी खाजगी संपत्ती म्हणून दावा केला आहे. हे सगळं सुरु असताना लाखों लोकांना त्याची माहीतीच नाही हिच मोठी शोकांतिका आहे. जयस्तंभ सध्या आपल्या ताब्यात नाही, एक जानेवारी साठी आपल्याला न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. परवानगी संपली तर आपण जयस्तंभा जवळ जाऊ शकत नाही. जयस्तंभ ला आपण सध्या रंगरंगोटी, सुशोभीकरण करू शकत नाही, काही लोक जयस्तंभ पाडण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आणि आपण फक्त एक दिवस गर्दी करून दुसऱ्या दिवशी थंड होतो तर काही लोक जयस्तंभ पाडावा असे वक्तव्य करत आहेत. आपण भावनिक होऊन एखाद्या च्या वक्तव्यावर हिंसक प्रतिक्रिया देतो. परंतु हिंसक प्रतिक्रिया देऊन काही फायदा नाही. यासाठी आपल्याला संविधानीक मार्गाने जयस्तंभाचे संरक्षण करावे लागेल तरच येणाऱ्या काळात आपण जयस्तंभ हा पाचशे शुरविरांच्या पराक्रमाचे प्रतिक म्हणून सांगु शकु. एकदा जर स्तंभ आपल्या हातून गेला तर कोरेगांव भिमाला जाणे तर बंद होईल परंतु येणाऱ्या पिढीला आपण काय सांगणार? पाचशे शुरविरांनी अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून अन्याया विरोधात आवाज उठवून विजय मिळवला त्यांचे प्रतिक असलेल्या जयस्तंभाला आम्ही लाखोंच्या संख्येने दरवर्षी वंदन करायला जात होतो पण स्वार्थी वृत्ती आणि बेकीकरण यामुळे आम्ही आमची ताकद दाखवू शकलो नाही. असे बोलण्यात आपल्याला शुरता वाटेल का? यावर विचार केला तर मनात प्रश्न येतोच शुरविरांना वंदन करण्याचा अधिकार आहे का? प्रश्न, समस्या खुप आहेत. गरज आहे ती गर्दी पेक्षा गांभीर्याने एकत्र येऊन, एकिकरणाची ताकद दाखवून, संविधानीक मार्गाने आपला लढा मजबूत केला तरच आपण जयस्तंभ वाचवू शकतो. आणि समाजामध्ये स्वाभिमान व शौर्यही निर्माण करू शकतो.

अन्याय अत्याचार गाडून टाकण्यासाठी जिवाची पर्वा न करता अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून पेशवाई नष्ट करून जागतिक शौर्य सिद्ध करणाऱ्या जागतिक शुरविरांना स्वाभिमानी वंदन. सामाजिक व राजकीय एकी झाली तरच सामुहिक वंदन केल्याचे सार्थक होईल.

---------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# एस.एम.आर. स्विमिंग पूल अँड हेल्थ क्लबच्या माध्यमातून उत्कृष्ट समाजकार्याचा वारसा : सोमय मुंडे



लातूर : श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था द्वारा संचलित एस.एम.आर. स्विमिंग पूल अँड हेल्थ क्लबच्या माध्यमातून लातुरात उत्कृष्ट समाजकार्याचा वारसा जोमाने पुढे चालविला जातोय, ही बाब अतिशय समाधानकारक असल्याचे प्रतिपादन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले.

एस.एम.आर. स्विमिंग पूल अँड हेल्थ क्लबच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा रविवारी सायंकाळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी या नात्याने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मीरमण लाहोटी हे होते. यावेळी श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शैलेशकुमार लाहोटी, पुणे येथील माइंड मॅजिक शोचे अमित कलंत्री, संस्था अध्यक्ष राजकुमार मालपाणी, हुकूमचंद कलंत्री, कमलकिशोर अग्रवाल, लक्ष्मीकांत कर्वा, डॉ हरिप्रसाद सोमाणी, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. आपल्या मनोगतात सोमय मुंडे यांनी शिक्षणाची पंढरी म्हणून राज्यभरात नावलौकिकास पात्र ठरलेल्या लातूरमधील एसएमआर स्विमिंग पूल अँड हेल्थ क्लब या संस्थेने मागच्या २५ वर्षात दूरदृष्टी ठेवून कार्य केले आहे. लातूर शहरातील एक दर्जेदार आणि उत्कृष्ट स्विमिंग पूल म्हणून विश्वासाने याकडे पहिले जाते. कोणतीही संस्था अथवा उपक्रम चालविताना दृष्टिकोन खूपच महत्वाचा असतो. दृष्टीकोनावरच विश्वास ठेवून समाजातील विविध घटकातील लोक संबंधित संस्थेची जोडली जात असतात. लोकांच्या सहभागाशिवाय संस्था यशस्वी होऊ शकत नसते. या संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील बॅडमिंटन खेळाडू घडविण्यासाठीही सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. त्यामुळे भविष्यात या संस्थेच्या माध्यमातून तयार झालेले बॅडमिंटन खेळाडू राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकल्याशिवाय राहणार नाहीत,असा विश्वासही मुंडे यांनी व्यक्त केला. तसेच संस्थेच्या रौप्यमहोत्सवास आपल्याला निमंत्रित केले गेले, तसेच संस्थेच्या सुवर्ण महोत्सवासही आवर्जून निमंत्रित करा, मी जेथे कार्यरत असेन तेथून नक्की आपल्या कार्यक्रमास येईन, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

संस्था अध्यक्ष राजकुमार मालपाणी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या या यशात समाजातील सर्वच घटकांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. संस्थेचे सचिव अॅड. आशिष बाजपाई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी स्विमिंग पूल व हेल्थ क्लबच्या २५ वर्षातील प्रगतीचा लेखाजोखा संक्षिप्त स्वरूपात उपस्थितांपुढे मांडला . संस्थेच्या उभारणी दरम्यान सहकार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांच्या नावांचा सन्मानपूर्वक उल्लेख करून त्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. आपल्या संस्थेच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रासाठीही भरीव कार्य केले जात असल्याचे नमूद करून त्यांनी राज्यात क्रीडा विद्यालयाची नितांत आवश्यकता असल्याचे सांगून त्यासंदर्भात आपण राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणीही केली होती असे सांगितले. पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षणासोबत त्यांच्या शरीर स्वास्थाकडेही आवर्जून लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पुण्याच्या अमित कलंत्री यांनी माईंड मॅजिक शोचे सादरीकरण करून उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. यावेळी संस्थेच्या प्रगतीत भरीव योगदान दिलेल्या अजितलाल आळंदकर, जुगलकिशोर गिल्डा, सत्यनारायणजी कर्वा यांच्यावतीने श्रीकांत कर्वा , करुणाकरण शेट्टी, विजयकुमार सहदेव, स्व. शाम भार्गव यांच्या स्मृत्यर्थ चैतन्य भार्गव, स्व. रामकिशन भंडारी यांच्या स्मृत्यर्थ हरिकिशन भंडारी, स्व. मुरलीधरजी इनानी स्मृत्यर्थ दिनेश इनानी यांचा पोलीस अधीक्षक मुंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात करण्यात आला. तसेच संस्थेच्या यशात योगदान देणाऱ्या सर्वश्री मिलिंद शेटे, भाऊसाहेब भालेराव, संतोष दुधाळे , बाबा पालखे, सतीश जोशी, विशाल कांबळे, अमित शहा आदी कर्मचाऱ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आशिष सोमाणी यांनी केले. कार्यक्रमास समाजाच्या विविध स्तरातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आ. रमेशआप्पा कराड यांनी काळ्या आईची पूजा करून साजरी केली वेळ अमावस्या





लातूर :– कृषीप्रधान भारत देशात कृषीशी निगडित अनेक सणवार साजरे होतात. असाच एक सण म्हणजे वेळ अमावस्या. यानिमित्ताने लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी शेतातील काळ्या आईचे ऋण फेडण्यासाठी आज शेतात जाऊन शेतातील देवतांची आणि काळ्या आईची मनोभावे पूजा करून वेळ अमावस्या साजरी केली.

वेळाअमावस्येचे शेतकरी बांधवांच्या जीवनात फार महत्त्व आहे. आपल्यासह संपूर्ण जगाचे पोट भरणाऱ्या आपल्या काळ्या आईच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. कडब्याच्या कोपात लक्ष्मीची प्रतिष्ठापना करतात, यथासांग पूजा केली जाते, शेतातील पांडवांना नवा रंग दिला जातो, रब्बी हंगामातील गहु, हरबरा, ज्वारी, करडई, सुर्यफुल आदी पिकाचा ’रब्बीचा हंगाम चांगला होऊ दे’ अशी प्रार्थना करून शेतकरी आपल्या कष्टाला भरभरून यश मिळावे अशी अपेक्षा करतो. कराड कुटुंबीयांच्या वतीने ही लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील शेतात वेळ अमावस्याचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी सुविद्य पत्नी सौ. संजीवनीताई कराड यांच्या समवेत भक्ती भावे पूजा केली व शेतकऱ्यासह सर्वांच्या समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यावेळी सर्वांनी मिळून स्नेहभोजनाचा आनंद घेतला याप्रसंगी रामेश्वर येथील माजी सरपंच तुळशीराम अण्णा कराड, प्रतिष्ठित शेतकरी काशीराम नाना कराड, डॉ. हनुमंत कराड, राजेश कराड, भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड, पृथ्वीराज कराड, तेजस कराड, सौरभ कराड, दिग्विजय कराड, रणवीर कराड, राजवीर कराड, रघुवेंद्र चाटे, श्रीराम नागरे, देवेंद्र कराड यांच्यासह महिला पुरुष आबाल वृद्ध मित्रपरिवार व इतर अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांसाठी मोफत सीटी बस प्रवास योजना स्मार्टकार्ड नोंदणीसाठी १० जानेवारी पर्यंत मुदतवाढ

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा–या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका,मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा–या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून दिनांक १९.१२.२०२४ पासून संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे रजिस्ट्रेशन चालू आहे तसेच लातूर शहर हद्दीत राहणा–या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी असे पण कळविण्यात आले होते व त्याची मुदत ३१.१२.२०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती.

महिलांची स्मार्ट कार्डची मागणी लक्षात घेता ती मुदत व कार्ड वाटपाची मुदत १०.०१.२०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे व तोपर्यंत सदर ची योजना पुर्वीप्रमाणेच चालू राहील याची शहर बस मधुन प्रवास करणा–या लातूर शहर महानगरपालिका, लातूर हद्दीतील राहणा–या सर्व महिलांनी नोंद घ्यावी.

# बुद्धविचार केंद्रियता हे महेंद्र ताजणेंच्या कवितेचे समानसूत्र

## प्रख्यात ज्येष्ठ कवी आणि ख्यातकीर्त चित्रकार,मंगेश नारायणराव काळे यांचे प्रतिपादन.




वाशिम :– आंबेडकरवादी कवितेमध्ये महेंद्र ताजणे यांची कविता वेगळी आहे. महेंद्र ताजणे यांची कविता केवळ आंबेडकरवादी परिघात फिरत नाही तर तिचे परिप्रेक्ष्य त्या पलीकडे जाणारे आहे,असे जाणवत राहते. नामदेव ढसाळ,यशवंत मनोहर ते अरुण काळे यांच्या कवितांची बीज परंपरा महेंद्र ताजणे यांच्या कवितेत परावर्तित झालेली पाहायला मिळेल. त्यांच्या प्रत्येक कवितेत बुद्धाचा विचार केंद्रस्थानी उजागर झाला आहे. बुद्धविचार केंद्रियता ही महेंद्र ताजणेच्या कवितेचे समान सूत्र आहे, असे प्रतिपादन विख्यात ज्येष्ठ कवी आणि जगप्रसिद्ध चित्रकार, मंगेश नारायणराव काळे यांनी महेंद्र ताजणे यांच्या खूप काही आणखी कवितासंग्रहाच्या प्रकाशन समारंभा दरम्यान कवितासंग्रहाचे प्रकाशन करतांना प्रतिपादन केले. महेंद्र ताजणे यांची कविता अत्यंत चिंतनशील आणि गहिरी आहे. आक्रस्थाळेपणा ह्या कवितेचा स्वभाव नाही. ती अत्यंत संयमी सयंत आहे. वर्तमान व्यवस्थेचे चित्र रेखाटून भूमिका दर्शीस्वभाव अधोरेखित करणारे विचारद्रव्य त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित होताना दिसते. जिल्हा शासकीय ग्रंथालय येथे खूप काही आणखी कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्या दरम्यान महेंद्र ताजणेंच्या कवितेच्या संदर्भात मंगेश नारायण काळे यांनी पुस्तकाचे प्रकाशन करताना आपले विचार प्रदर्शित केले. खूप काही आणखी या कवितासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.पुढे बोलताना काळे म्हणाले, कॉपर कॉईनचे सरबजीत गरच्छा दिल्ली यांनी अत्यंत दर्जेदार स्वरुपात हे पुस्तक काढले आहे.मी प्रकाशन व्यवस्थेचा अध्यक्ष असल्याने या कवितासंग्रहाच्या अंतर्बाह्य मांडणीकडे विशेष लक्ष दिले.कॉपर कॉईन हे इंग्रजी,हिंदी , मराठी,आणि विविध भाषेतून कवितासंग्रह काढत असते.मराठी कवितेला न्याय मिळावा यासाठी मी प्रयत्नशील असतो. यावेळी जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती, सुरेभाऊ मापारी, ज्येष्ठ कवी दिनकर मनोहर, आंबेडकरवादाची पुनर्मांडणी करणारे ज्येष्ठ,विचारवंत रवींद्र इंगळे चावरेकर, कार्यक्रमाचेअध्यक्ष, ज्येष्ठ कवी, अनिल कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. महेंद्र ताजणे हे सूर्यप्रतिभेची कवी आहेत. मानवी जीवनाचे स्वयंदीपत्व हीच या कवितेची प्रतिज्ञा आहे. मानवी जीवनाच्या उजेडध्यासाची कविता ही सूर्यस्ववभावी व्यक्तिमत्वातून प्रकटत असते.

सूर्य मावळला की सर्वात आधी कवीच उगवतो

चांदण्यांच्या पंखांनी उजेडाची किरणं उधळत या उजेडमयतेचे अदिबंध कवी महेंद्र ताजणे यांच्या सूर्यस्वभावी प्रतिभेत अंतर्भूत झाले आहे.असे कवितेवर भाष्य नोंदवताना प्रख्यात आंबेडकरवादी विचारवंत डॉ. प्रकाश राठोड यांनी आपली भूमिका विशद केली. कवितासंग्रहातील अनेक कवितांची त्यातील प्रतिमांची नोंद घेऊन त्याचा अन्वयार्थ लावत कवितेच्या संदर्भातील विचारप्रेरक मांडणी डॉ.प्रकाश राठोडांनी महेंद्र ताजणे यांच्या कवितेच्या संदर्भात केली.महेंद्र ताजणे यांनी मनोगतात बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रक्रियेची पुनर्रचना कवितेच्या माध्यमातून केल्याची सांगितले.मी जळत्या प्रतिमेचा कवी आहे. कवितेमुळेच मी जिवंत आहे. कविता हाच माझा श्वास आहे. मी स्वतःला पुन्हा पुन्हा आगीच्या भट्टीत जाळून घेत असतो. मी पुन्हा पुन्हा आगीच्या भट्टीत स्वतःला ढकलून देत असतो. आणि मग मला माझ्या कवितेची भेट होते. मला माझी कविता भेटते. असे उद्गार महेंद्र ताजणे यांनी आपल्या कवितेच्या संदर्भात मनोगतातून व्यक्त केले. हे मनोगतिय विवरण सभागृहात विशेषी होऊन गेले. दरम्यान जेष्ठ आंबेडकरवादी विचारवंत, आंबेडकरवादी विचाराची पुनर्मांडणी मांडणी करणारे रवींद्र इंगळे चावरेकर, ज्येष्ठ कवी दिनकर मनवर,आदींनी ताजणेच्या कवितेवर अभ्यासपूर्ण भाष्य केले. चावरेकर म्हणाले, महेंद्र ताजणे यांची कविता धर्म व्यवस्थेच्या, जातीय व्यवस्थेच्या,वर्ण व्यवस्थेच्या, विखारी विषमतेच्या विरोधात बोलत राहते. त्यांची कविता अतिशय दर्जेदार असून ती बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेची प्रवाही मांडणी करते. आपले विचारमूल्य मांडताना ते म्हणाले, एखाद्या कवीवर मोठ्या कवीचा प्रभाव असणं वेगळं आणि त्याचं अनुकरण असणं वेगळं. प्रभाव असणे हे वाईट नाही पण अनुकरणापासून कवीने दूर राहावं.महेंद्र ताजणे यांनी अशा अनुकरणापासून दूर राहावे. असे विचार यावेळी त्यांनी आपल्या विचार मूल्यांतून सांगितले. अनुभव समृद्धता ही संवेदनशील कवीला अधिकाधिक अंतर्मुख करणारी असते.महेंद्र ताजणे हे संवेदनशील कवी आहेत. आतले आवाजही तो जसे येतील तसे ऐकत असतो. आतले आवाज कवीला ऐकू आले पाहिजे. आतल्य आवाजाची कविता ही सर्वश्रेष्ठ कविता असते.महेंद्र ताजणे यांना आतले आवाज ऐकू येतात. असे त्यांनी आपल्या कवितिक संवाद मूल्यांतून अधोरेखित केले. प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष, अनिल कांबळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विचार मांडताना महेंद्र ताजणे यांची कविता समजून घेण्यासाठी ती सोपी नाही. वाचकांना त्यांची कविता समजून घेताना वाचकांचा कस लागतो. महेंद्र ताजणे व्यवस्था बदलाची कविता लिहितात.आंबेडकरी कवितांचाचा प्रांत त्यांच्या कवितांतून अधोरेखीत होतो. संविधानाच्या रक्षणाची ऊर्जा त्यांच्या कवितेच्या पानापानावर कोरलेली सापडेल. अनिल कांबळे यांनी कवितासंग्रहातील अनेक कविता वाचून दाखवत, त्याचा अर्थ उलगडून दाखवला.

दरम्यान आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते, गोपाळराव आटोटे गुरुजी रिपाई नेते, आणि दलित पँथर, गोवर्धन चोथमल, सुभाष अंभोरे, संजय घुगे, वंदना ताजणे, देवानंद ताजणे, अरविंद ताजणे, पत्रकार विनोद तायडे, पत्रकार प्रवीण पट्टेबहादूर, आम्रपाली भगत, विद्यार्थी संस्कार प्रचारक, अतुल भगत आदी मान्यवरांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कवयित्री उषाताई आढागळे, कवयित्री प्रा. सुनीता अवचार, पत्रकार प्रवीण पट्टेबहादुर आदींनी महेंद्र ताजणे यांचा शाल, पुष्पगुच्छ सन्मानपत्रासह सन्मान केला .

समारंभाच्या प्रारंभी सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलित करून आणि हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. यशवंत मनोहर यांचा कार्यक्रमानिमित्ताने आलेला काव्यसंदेश प्रा. सुनीता अवचार यांनी वाचून दाखवला. समारंभाचे भारदस्त प्रास्ताविक, कवी प्रशांत वंजारे यांनी केले.अत्यंत सुरेख सूत्र संचालन सुभाष गोविंदा अंभोरे यांनी केले. उपस्थित साहित्यिक, कवी मान्यवरांचा परिचय कवी मोहन शिरसाठ यांनी करून दिला. कवी दीपक ढोले यांनी खूप काही आणखी कविता संग्रहातील, काही कविता वाचून दाखवल्या. कवी शेषराव पिराजी धांडे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले यावेळी सभागृहात अनेक साहित्यिक, कवी विचारवंत, कार्यकर्ते कलावंत, सामाजिक, सांस्कृतिक साहित्य प्रांतातील विशेष मान्यवरांसह आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेंद्र ताजणे , वंदना ताजणे, राजकुमार पडघान धम्मध्वज ताजणे, भीमरत्न मुळे, भीमराव इंगोले ,अरुण शेळके पाटील, अक्षय इंगोले,विनोद इंगोले, मुकुंद परळीकर ग .ना. कांबळे, मोहन शिरसाट, शेषराव धांडे,दीपक ढोले, सुभाष अंभोरे, अरविंद उचित , मधुराणी भीमराव श्रृंगारे, बनसोड आदींनी परिश्रम घेतले

# मनपाच्या श्री शिवछत्रपती ग्रंथालयाची ईमारतीची दुरवस्था झाल्याने कर्मचारी,वाचक,स्पर्धा परीक्षार्थींचा जीव टांगणीला!









लातूर / प्रतिनिधी :- पूर्वीची नगर पालिका आणि आताच्या लातूर शहर महानगरपालिकेच्या श्री शिवछत्रपती ग्रंथालयाची ५३ वर्षीय ईमारत सध्या जुनी होवून ती मोडकळीस आली असून,गेली पंधरा वर्षांपासून तिची डागडुजी,वा रंगरंगोटी केलेली नाही.त्यामुळे येथे येणार्या वाचक,वाचक सभासद आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणार्या सर्वसामान्य परिवारातील सुमारे सव्वाशे विद्यार्थ्यांच्या व कार्यरत कर्मचार्यांच्या जिवीताचे काय होणार असा? असा प्रश्न निर्माण झाल्याने या ईमारतीचा तात्काळ जिर्णोध्दार तसेच नवीन ईमारतीचे काम तातडीने हाती घेणे गरजेचे झाले आहे.

लातूर शहर नगरपालिकेच्यावतीने शहरातील नागरिकांना रस्ते,पथदिवे,पिण्याचे पाणी,सार्वजनिक स्वच्छता या नागरी सुविधांसोबतच वाचनसंस्कृतीचा प्रसार,प्रचार व्हावा म्हणून जुनी रेल्वे लाईनच्या उत्तरेला नगर पालिकेच्या जागेवर तीन पिलर बांधकामाची मजली ईमारत उभारण्यात आली.तिचे उद्घाटन केशवराव सोनवणे यांच्या हस्ते व नगराध्यक्ष ॲड.शिवराज पाटील चाकूरकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.१ नोव्हेंबर १९७१ रोजी करण्यात आले. आणि त्यानंतर ती वाचकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली.

या ग्रंथालयात आरंभी ग्रंथपाल म्हणून आर.बी.गुंडेकर यांनी सुरवातीलची तीन वर्षे काम पाहिले,पण ते राजकीय खेळामुळे टिकले नाहीत,मग राजीव नाईक यांनी तर १९७८ पर्यंत ग्रंथपाल पदाचा भार वाहिला. १३ सप्टेंबर १९८७ पासून ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी तीन दशकांपेक्षा म्हणजे २०१०पर्यंत सलग सेवा दिली.या ग्रंथालयाचा जिल्हाधिकारी,न्यायाधिश,वरिष्ठ पोलीस अधिकारी,विविध स्थरातील कर्मचारी अधिकारी आणि सर्वसामान्य वाचक,समीक्षक,साहित्यिक,पत्रकार,साहित्याचे संशोधक,विविध मराठी, इंग्रजी,उर्दू,हिंदीतील दैनिक, मासिके,दिवाळी अंक,वार्षिक अंक आणि हजारो वैविध्यपूर्ण दुर्मिळ,प्राचीन,ते स्पर्धा परीक्षेच्या जवळपास ५० हजार ग्रंथसंपदेचा लाभ घेत होते,घेत आहेत.

या ग्रंथालयाकडे नगरपालिकेच्या साहित्यप्रेमी मुख्याधिकारी,राजकीय नेते केशवराव सोनवणे,ॲड.शिवराज पाटील चाकूरकर,ॲड.विलासराव देशमुख,दिलीपराव देशमुख,ॲड.मनोहरराव गोमारे,ॲड.भगवानराव देशपांडे,अनेक सुज्ञ नगरसेवक,तसेच डॉ. जनार्दन वाघमारे,डॉ.सूर्यनारायण रणसुभे,डॉ.शिवराज नाकाडे,प्रा.ङ्ग.म.शहाजिंदे,डॉ. नागोराव कुंभार,अतुल देऊळगावकर,सु.ग.जोशी,प्रा.वसंत मा.जाधव,डॉ.शेषराव मोहिते,ओमप्रकाश होळीकर,चंद्रकांत देऊळगावकर,क.हे.पुरोहित,जयप्रकाश दगडे,भारत सातपुते,जीवनधर शहरकर यासारख्या असंख्य साहित्यिक,वाचनप्रेमींनी लक्ष देवून येथे दर्जेदार ग्रंथसंपदा कशी उपलब्ध होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविले.

विशेष म्हणजे ग्रंथालयाचे ग्रंथपाल पांडुरंग अडसुळे यांनी अनेक वर्षे या ग्रंथालयात विविध विषयांवर,देशातील अनेक थोर साहित्यिक,वक्ते,नेते,कार्यकर्ते यांच्या दर्जेदार व्याख्यानांची व्याख्यानमाला आयोजित करुन शहराचे वैचारिक भरण पोषण करण्याचे मोलाचे काम केले आहे. या ग्रंथायातील दुर्मिळ सह सर्वंच ग्रंथांचे संगणकीकरण करण्यात आले आहे.

गेली दहा वर्षांपासून या ग्रंथालयात अतिशय अल्प दरात स्पर्धा परिक्षार्थींसाठी पहिल्या आणि तिसर्या मजल्यावर अभ्यासिकेची चोवीस तासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचा आज घडीला सुमारे १२५ विद्यार्थी,विद्यार्थींनी लाभ घेत आहेत,विशेष म्हणजे या अभ्यासिकेमुळे सामान्य परिवारातील अनेकांना शासकीय,निमशासकीय सेवेत संधी मिळाली आहे.मिळणार आहे.

श्री शिवछत्रपती ग्रंथालयात प्रशस्त अशी आसन व्यवस्था,टेबल्स,वीज,पंखे आहेत,पहिल्या मजल्याचा पश्चिम भाग व दुसर्या मजल्यावर ग्रंथांचे दालन आहे.महिला,पुरुषांसाठी स्वतंत्र अशी मुतारी,शौचालयाची सोय केलेली आहे,पण शौचालय बंद असल्यात जमा आहे,तिन्ही मजल्यावरील खिडक्यांच्या काचा,तावदाने तुटली आहेत.पूर्णवेळ ग्रंथपाल व पुरेशे प्रशिक्षित ग्रंथालय कर्मचारी आवश्यक आहेत,इथल्या मुतारीचीही दुरावस्था झालेली आहे. ईमारतीच्या दक्षिणेकडे चार ङ्गुट उंचीची भर टाकलेली आहे,त्यामुळे मुतारीचे पाणी सहज बाहेर जात नाही,शौचालयाचीही अशी स्थिती असल्याने ते बंद आहे.येथे शुध्द पिण्याच्या पाण्याची/नळाची चोवीस तास सुविधा आहे.पण नळापाशी पडणारे सांडपाणी बाजूला भींतीलगत साठल्याने आता त्यात डुकरांचा वावर सुरु झाला आहे,त्यामुळे वाचक,स्पर्धा परिर्क्षार्थींना डेंग्युसारखे साथीचे आजार होवू शकतातअशी भीती व्यक्त केली जात आहे.

## रेणापुरात परिवर्तन संस्थेच्या वतीने एक दिवशीय लघु - उद्योग प्रशिक्षण शिबीर संपन्न

रेणापुर/ प्रतिनिधी :- परिवर्तन संस्था सुमठाणा आणि उज्ञीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण रेणापुर येथे पार पडले.



पंचायत समिती सभागृह रेणापुर येथे परिवर्तन संस्था सुमठाणा आणि उज्ञीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील पानगांव,आरजखेडा,तत्तापुर,गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवर्तन संस्थेचे मुख्य समन्वयक नागनाथ चव्हाण होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उज्ञीवन बँकेचे विभागीय व्यवस्थापक गणेश मोरे,लातुर शाखेचे श्री.गुट्टे, श्री.अशीष,परिवर्तन संस्थेचे संस्थेचे सचिव बालाजी शिंदे उपस्थित होते. यावेळी मोरे यांनी अल्पभुधारक शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणुन आणि महिलां बचत गटानी केवळ महिण्याला शे-पाचशाची बचतच न करिता स्वतःचे लघु उद्योग कसे उभारले जातील याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले तर गुट्टे यांनी उज्ञीवन बँके कडून कमी व्याज दरात वैयक्तीक व समुह लघु उद्योग उभारण्या करिता आणि शेतीसाठी लागणारे अवजारे घेण्या करिता कमीत कमी दराने कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता बँक पुढाकार घेईल असे सांगितले.नागनाथ चव्हाण यांनी आजच्या काळातली न परवडणारी शेती आणि सध्याची महागाई यामुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांनी,महिला बचत गटांनी छोट्या मोठ्या उद्योगाकडे वळावे असे सांगितले तर बालाजी शिंदे यांनी परिवर्तन संस्था हि लघु उद्योग उभारण्या कामी अल्पभुधारक शेतकरी,महिला बचत गट आणि बँक यांच्यातील दुवा म्हणुन काम करणार असल्याचे सांगत ज्यास्तीत अल्पभुधारक शेतकरी,महिला बचत गटांनी याचा लाभ घेण्याचे अवाहनही केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रेणापुर तालुका समन्वयक विष्णु आचार्य यांनी केले.यावेळी अंकुश चिकटे,डिंगाबर चव्हाण,किशोर कसबे, बालीका चिकटे,प्रणिता आचार्य,संजय जोगदंड,गौतम आचार्य,मोहन वायदंडे,मधुकर घोडके,त्र्यंबक घोडके, जयश्री घोडके,शितल जोगदंडसह पानगांव,आरजखेडा, तत्तापुर,गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगटातील दिडशे महिला पुरुष उपस्थित होते.

## लातुरमध्ये अभाविपचे ५९ वे प्रदेश अधिवेशन

### मराठवाडा व खानदेशातील १ हजार विद्यार्थी प्रतिनिधी घेणार सहभाग

लातूर /प्रतिनिधी :- अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाचे ५९ वे प्रदेश अधिवेशन दिनांक ०२ ते ०४ जानेवारी दरम्यान लातूर येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती अभाविपच्या प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. यावेळी स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा, स्वागत समिती सचिव सुनिल देशपांडे ,महानगर अध्यक्ष प्रा.डॉ. प्रसाद कदम, महानगर मंत्री तेजुमई राऊत उपस्थित होते.




पत्रकारांशी संवाद साधताना वैभवी ढिवरे म्हणाल्या की, गुरुवारी सकाळी ११:४५ वाजता अधिवेशन उद्घाटन समारंभ संपन्न होणार आहे. यावेळी अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री एस. बालकृष्णजी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर सायंकाळी ०५:२५ वाजता होणाऱ्या भाषण सत्रात अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री देवदत्त जोशी मार्गदर्शन करणार आहेत. खान्देश आणि मराठवाडा विद्यार्थी परिषद कार्य प्रभाव व योजना या विषयावर ते अधिवेशनाला उपस्थित प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. अधिवेशनादरम्यान दि. ०३ जानेवारी, शुक्रवार रोजी दुपारी ०३:३० वाजता शहरातून शोभायात्रा काढली जाणार आहे ही यात्रा ओडिया राज चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - अशोक हॉटेल - महात्मा गांधी चौक - हनुमान चौक - गोलाई या मार्गाने जाणार आहे. सायंकाळी ०४:४५ वाजता गोलाई येथे जाहीर सभेने शोभा यात्रेचा समारोप होणार आहे. प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे व छात्र प्रतिनिधी या सभेस संबोधित करणार आहेत.

दि. ०४ जानेवारी, शनिवार रोजी सकाळी ०९ वाजता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर शिक्षणतज्ञ प्रा. डॉ. अनिल राव हे मार्गदर्शन करणार आहेत.या अधिवेशनात शैक्षणिक सामाजिक तसेच उद्योजकता या विषयावर प्रस्ताव पारीत करण्यात येणार आहेत. तसेच अधिवेशनाच्या शेवटी येणाऱ्या वर्षभरात विद्यार्थी परिषदेची आगामी दिशा प्रदेश मंत्री मांडतील व समारोप प्रसंगी अभाविप च्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा प्रांत अध्यक्ष करतील.

या चार दिवस चालणाऱ्या अधिवेशनात सर्व नागरिकांनी उत्साहपूर्वक येणाऱ्या सर्व प्रतिनिधींचे स्वागत करावे व अधिवेशनात सहभाग घ्यावा,असे आवाहन स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा यांनी केले.

अभाविपच्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनात होणाऱ्या विविध भाषण व चर्चा सत्रांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले, प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा, स्वागत समिती सचिव सुनिल देशपांडे, अभाविप लातूर महानगर अध्यक्ष प्रा. डॉ. प्रसाद कदम व महानगर मंत्री तेजूमई राऊत यांनी केले आहे.

## सीसीआयची कापूस खरेदीची शक्यता मावळली किनवट तालुक्याच्या शेतकरी आजही सीसी आय खरेदी ची वाट पाहते

### किनवट येथे खरेदी केंद्र देणार

**छत्रपती संभाजीनगरचे सीसीआयचे स्वप्नील दडमल हे किनवट येथे खरेदी केंद्र देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. टेंडरही काढण्यात आले. टेंडर २६ डिसेंबर रोजी ओपणही झाले; पण किनवट तालुक्यातील चिखली फाटा येथील जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्री पॅरामीटरमध्ये येत नसल्याने आता पुन्हा रिटेंडर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

किनवट/शेख शौकत :-कापूस हंगाम संपत आला तरी शासनाच्या भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) ची किनवट तालुक्यात खरेदी सुरू झाली नाही. याचाच फायदा घेऊन खासगी व्यापारी हमी भावापेक्षा कमी भावाने कापूस खरेदी करून मोकळा होतो आहे. शेतकरी उपाशी तर व्यापारी तुपाशी अशी परिस्थिती आहे. किनवट येथे मंजूर जिनिंगचे टेडर भरले आहे, ते ओपनही झाले. पण फॅक्ट्री सीसीआयच्या पॅरामीटरमध्ये येत नाही. 'पीएफबीएफ' नाही, असा प्रॉब्लेम असल्याने आता पुन्हा नव्याने टेडर प्रक्रिया होणार आहे. दरम्यान, तालुक्यातील शेतकरी आपला कापूस तेलंगणातील आदिलाबाद येथे नेऊन विक्री करीत असल्याचे चित्र आहे. डिसेंबर महिना संपायला आला तरी खरेदी केंद्र सुरू होण्याची शक्यता कमीच आहे. जिनिंगचे टेडर काढण्यात आले आहे. ते भरण्यातही आले आहे. त्याची ओपनिंग झाली आहे. पण ते जिनिंग प्रेसिंग सीसीआयच्या पॅरामीटरमध्ये येत नाही. त्यामुळे किनवटचा कापूस आदिलाबादच्या सीसीआय खरेदी केंद्रावर जात असल्याचे दिसून येत आहे. किनवट तालुका हा तेलंगणा व विदर्भाच्या सीमेवर आहे. पण तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जेव्हा जेव्हा सीसीआयच्या कापूस खरेदी केंद्रावर कापूस विकावा लागला तेव्हा विदर्भ व तेलंगणाप्रमाणे लांब धाग्याचा भाव मिळालेला नाही. याबाबत कोणी आवाज उठवत नाही किंवा उठवला नाही. कापूस उत्पादक शेतकरी खासगी व्यापाऱ्यांना आपला कापूस ६ हजार ५०० ते ६ हजार ७०० प्रतिक्विंटल दराने विक्री करीत आहे. यापूर्वीच काही शेतकऱ्यांनी विक्री केला आहे.



आजही शेतकरी सीसीआयच्या खरेदीची वाट पाहत आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE